**मार्गदर्शक सुचना**

## राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळाच्या (NSFDC) सवलतीच्या व्याजदराने व्यवसाय कर्ज योजना (२०१९)

**पहिला टप्पा**

**प्रस्तावना**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास महाराष्ट्र शासनाने केंद्रीय महामंडळाची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून नियुक्ती केलेली आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळाकडुन (NSFDC) मिळणाऱ्या कर्ज निधीतून या महामंडळाच्या अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील व्यक्तींसाठी सवलतीच्या व्याजदराने व्यवसाय मुदती कर्ज योजना (Term Loan) राबविण्यात येते.

NSFDC या राष्ट्रीय महामंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या कर्ज निधीतून सन २०१९ या वर्षासाठी पहिल्या टप्प्यात रु. ३ लक्ष, रु. ४ लक्ष व रु. ५ लक्ष मर्यादेच्या मुदतीकर्ज योजनाची अमलबजावणी करायची आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता व निकष, अटी व शर्ती, कर्ज वितरण कार्यपद्धती व कर्ज वसुली खालील नमुद केल्या प्रमाणे आहेत.

**I. योजनेचे स्वरुप -**

**राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ नवी दिल्ली (एन.एस.एफ.डी.सी.) मुदती कर्ज योजना**

i)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु.३,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| १. | केंद्रीय मंडळाचा सहभाग (एन.एस.एफ.डी.सी.) | रु.२,२५,०००/- (६% व्याज दर ) |
| २. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या) सहभाग २०% | रु.६०,०००/- (४% व्याज दर )<br>(५०,०००/- + १०,०००/-)<br>(महामंडळाचा सहभाग+अनुदानाचा समावेश) |
| ३. | अर्जदाराचा सहभाग ( प्रकल्प मुल्याच्या ५%) | रु.१५,०००/- |
| ४. | कर्ज परतफेड कालावधी | ५ वर्षे (समान मासिक ६० हप्ते) |
| ५. | प्र.श.प्र.व. हमीशुल्क दर -०.५०/- पै. प्रमाणे. | रु.५६२५/- |

✶ व्यवसायाची यादी शेवटी जोडली आहे. ✶ उपरोक्त काही बाबींमध्ये बदल होऊ शकतो.

ii)

| अ.क्र | प्रकल्प मूल्य | रु.४,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| १. | केंद्रीय मंडळाचा सहभाग (एन.एस.एफ.डी.सी.) | रु.३,००,०००/- (६% व्याज दर ) |
| २. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या) सहभाग २०% | रु.८०,०००/- (४% व्याज दर ) (७०,०००/- + १०,०००/-)<br>(महामंडळाचा सहभाग+अनुदानाचा समावेश) |
| ३. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मुल्याच्या ५%) | रु.२०,०००/- |
| ४. | कर्ज परतफेड कालावधी | ५ वर्षे (समान मासिक ६० हप्ते) |
| ५. | प्र.श.प्र.व. हमीशुल्क दर -०.५०/- पै. प्रमाणे. | रु.७५००/- |

✶ व्यवसायाची यादी शेवटी जोडली आहे. ✶ उपरोक्त काही बाबींमध्ये बदल होऊ शकतो.

iii)

| अ.क्र | प्रकल्प मूल्य | रु.५,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| १. | केंद्रीय मंडळाचा सहभाग<br>(एन. एस.एफ.डी.सी.) | रु.३,७५,०००/- (६% व्याज दर ) |
| २. | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या) सहभाग २०% | रु.१,००,०००/- (४% व्याज दर )<br>(९०,०००/- + १०,०००/-)<br>(महामंडळाचा सहभाग+अनुदानाचा समावेश) |
| ३. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मुल्याच्या ५%) | रु.२५,०००/- |
| ४. | कर्ज परतफेड कालावधी | ५ वर्षे (समान मासिक ६० हप्ते) |
| ५. | प्र.श.प्र.व. हमीशुल्क दर -०.५०/- पै. प्रमाणे. | रु.९३७५/- |

✶ व्यवसायाची यादी शेवटी जोडली आहे. ✶ उपरोक्त काही बाबींमध्ये बदल होऊ शकतो.

## II. योजनेचा उद्देश -

१. मागासवर्गीय घटकातील लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. तसेच बँकेमार्फत कर्ज घेताना येणा-या अडचणी व कर्ज मंजुर होताना होणारा विलंब टाळणे.
२. मागासवर्गीय घटकांतील सुशिक्षित व शासनाचे कौशल्य विकास विभाग, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाकडून तसेच शासकीय/निमशासकीय संस्थांमधून तांत्रिक प्रशिक्षण घेतलेली तसेच अनुभवी तरुण मुले/मुली यांना प्राधान्याने स्वयंरोजगारास कर्ज उपलब्ध करुन देणे.
३. मागासवर्गीय दुर्बल घटकांना लहान/लघू व्यवसाय करण्याकरिता तात्काळ वित्त पुरवठा करणे.
४. उक्त योजने अंतर्गत प्रथमत: पहिल्या टप्प्यात रु. ३ लक्ष, रु. ४ लक्ष व रु. ५ लक्ष मर्यादेच्या मुदती कर्ज योजनेची अमलबजावणी करण्यात येईल.

**व्यवसायाचे गट - (यादी सोबत जोडली आहे)**

i. कृषी व ग्रामीन क्षेत्रातील व्यवसाय
ii. लघुउद्योग क्षेत्रातील व्यवसाय
iii. सेवा व वाहतूक क्षेत्रातील व्यवसाय

## III. लाभार्थ्यांची पात्रता व निकष

१. अर्जदार अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाचा असावा.
२. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
३. अर्जदार वय १८ ते ५० वर्षे असावे.
४. अर्जदाराचा सिबील क्रेडीट स्कोअर किमान ५०० इतका असावा.
५. अर्जदाराचे एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ३.०० लाखापेक्षा जास्त नसावे.
६. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. अर्जदाराचे आधार कार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा.
८. अर्जदार महामंडळाच्या कोणत्याही (केंद्र व राज्य) योजनेचा थकबाकीदार नसावा.

## IV. अटी व शर्ती

१. कर्ज परतफेडीबाबत लाभार्थीने शपथपत्र द्यावे लागेल.
२. सदर कर्जातून लाभार्थीसाठी जी मत्ता निर्माण होणार आहे ती ज्यांच्याकडुन निर्माण होईल त्यांचेकडून ती मत्ता अचल (Immovable) असेल तर परस्पर या महामंडळाकडे गहाण (Mortgage) ठेवण्यात यावी. जर ती मत्ता चल (movable) असेल तर ती महामंडळाकडे तारणगहाण (Hypothecate) करणे आवश्यक.

३. जामीनदार स्वतः कर्ज परतफेडीची हमी घेत असल्याने त्यांनी स्वतःचे आयकर परतावा (इनकम टॅक्स रिटर्न्स) प्रमाणपत्र अथवा शेतकरी असल्यास ७/१२ उतारा किंवा कोणत्याही संस्थेचा नोकरदाराचे वेतन प्रमाणपत्राची प्रत द्यावी लागेल.
४. वसुलीकरिता भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सुचना कार्यपद्धतीप्रमाणे वसुलीची प्रक्रीया राबविण्यात येईल.
५. लाभार्थ्याने स्थापन केलेल्या व्यवसायाचा विमा स्वखर्चाने उतरविणे तसेच दरवर्षी विम्याचे नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.

## V. कर्ज वितरण कार्यपद्धती

१. दिनांक ११ मार्च, २०१९ पासून दिनांक ३० मार्च, २०१९ या कालावधीत महामंडळाच्या www.mahatmaphulecorporation.com/nsfdc या संकेत स्थळावर Online पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.
२. अर्जदाराना Online अर्ज करणे शक्य नसल्यास विहित नमुन्यातील अर्ज व वैयक्तिक कागदपत्रे स्वयं साक्षांकित करुन महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात रजिस्टर ए.डी. टपालाने पाठवावेत किंवा जिल्हा व्यवस्थापक कार्यालयात समक्ष दाखल करु शकतील .
३. ज्यांनी यापुर्वी या महामंडळाच्या अथवा केंद्रीय महामंडळाच्या कर्ज योजनेचा लाभ घेतला नाही त्या सर्वांना अर्ज करता येतील.
४. ऑनलाईन अर्जासोबत फक्त वैयक्तिक माहितीची फक्त (८) कागदपत्राच्या प्रती दाखल करावयाच्या आहेत. ((i) जात प्रमाणपत्र, (ii)आधार कार्ड, (iii) पॅन कार्ड, (iv) उत्पन्न दाखला, (v)शिधा पत्रिका, (vi) प्रकल्प अहवाल (vii) प्रशिक्षण प्रमाणपत्र (viii) व्यवसायाच्या जागेचा पुरावा.
५. जामीनदार, साक्षीदार, शपथपत्रे, व्यवसाय परवाने, मालमत्ता गहाणपत्र, कर्ज परत फेड शपथपत्र, विक्रेत्याचे दरपत्रक इ. पुराव्यांच्या कागदपत्राच्या प्रती केंद्रीय महामंडळाकडुन LOI मंजुरी व निधी उपलब्ध झाल्यानंतर व मुख्य कार्यालयाच्या आदेशानंतर प्रत्यक्ष कर्ज वाटपाचे वेळी दाखल कराव्या लागतील.
६. अर्जदाराने हमीशुल्क, स्वहिस्सा रक्कम अथवा इतर कोणतेही शुल्क रक्कम अर्जा सोबत महामंडळास भरणा करावयाची नाही. मात्र NSFDC कडुन कर्ज मंजुरी व निधी उपलब्धी नंतर मुख्य कार्यालयाच्या आदेशानंतर प्रत्यक्ष कर्ज वाटपाचे वेळी महामंडळास Online भरणे आवश्यक आहे.
७. कर्ज मंजुरीची कार्यपद्धती संपुर्णपणे पारदर्शी पद्धतीने असल्याने अर्जदारानी दलाल, मध्यस्थ अथवा अनाधिकृत व्यक्तींशी संपर्क करु नये.
८. माहितीसाठी महामंडळाचे जिल्हा कार्यालयात संपर्क करावा. तेथे अर्जाचा नमुना व कागदपत्राची सुचि उपलब्ध आहे.

वर नमुद मार्गदर्शक सुचना व कार्यपद्धती ही केंद्रीय महामंडळाच्या व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कर्ज मंजुरीच्या प्रलंबित धोरणानुसार निश्चित केलेली आहे. यामध्ये वेळोवेळी आवश्यकते नुसार बदल करण्यात येतील.

## दुसरा टप्पा

### NSFDC कडुन कर्ज प्रकरणात आशयपत्र (LOI) व निधी मंजुरी नंतर करावयाची कार्यवाही

i. जामीनदार, साक्षीदार, शपथपत्रे, व्यवसाय परवाने, मालमत्ता गहाणपत्र, कर्ज परत फेड शपथपत्र, विक्रेत्याचे दरपत्रक इ. पुराव्यांच्या कागदपत्राच्या प्रती केंद्रीय महामंडळाकडुन आशयपत्र (LOI) मंजुरी व निधी उपलब्ध झाल्यानंतर व मुख्य कार्यालयाच्या आदेशानंतर प्रत्यक्ष कर्ज वाटपाचे वेळी दाखल कराव्या लागतील.
ii. अर्जदाराने हमीशुल्क व स्वहिस्सा रक्कम NSFDC कडुन कर्ज मंजुरी व निधी उपलब्धी नंतर मुख्य कार्यालयाच्या आदेशानंतर प्रत्यक्ष कर्ज वाटपाचे वेळी महामंडळास Online भरणे आवश्यक आहे.
iii. अर्जदाराने जिल्हा कार्यालयात लिगल डॉक्युमेंट भरुन देणे आवश्यक.
iv. अर्जदाराने वरील सर्व बाबींची पुर्तता केल्यानंतर जिल्हा कार्यालयाकडुन ऑनलाईन पद्धतीने कर्ज व अनुदान रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात online पद्धतीने RTGS/NEFT द्वारे जमा करण्यात येईल.

## VI. वसुलीची कार्यपद्धती

१. कर्जाची परतफेड ही कर्ज वितरीत केल्याच्या ३ महिन्यानंतर सुरु करण्यांत येईल.
२. कर्ज परताव्याचे मासिक हप्ते ठरवून कर्ज वसुलीच्या दृष्टीने लाभार्थ्यांच्या बँक खात्यातून ECS (इलेक्ट्रॉनिक क्लिअरंस सिस्टिम) पध्दतीने वसुली करण्यांत येईल.
३. कर्जाची वसुली न झाल्यास महामंडळाकडे लाभार्थ्यांनी ठेवलेली तारण मालमत्ता अथवा जामीनदाराची मालमत्ता महसुल विभागामार्फत जप्त करणेची कार्यवाही सुरु करण्यात येईल.
४. जामिनदाराकडुन कर्ज वसुली शक्य न झाल्यास जमीन महसूलसंहितेच्या कलम २२१ नुसार जिल्हाधिकारी यांना मालमत्ता लिलाव करुन कर्ज वसुली करण्याचा प्रस्ताव दाखल करण्यात येईल.
५. वसुलीकरिता भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सुचना कार्यपद्धतीप्रमाणे वसुलीची प्रक्रीया राबविण्यात येईल.

**के. बी. फंड (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक**